# डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
## शिक्षण संचालनालय, नोडल सेल
## जाहिरात मसूदा

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत शिक्षण संचालनालय, नोडल सेल कार्यालयासाठी **"निव्वळ तातुरत्या स्वरूपात ११ माही तत्वावर"** खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष थेट मुलाखत घेण्यात येईल. सदर पदांसाठी सादर करावयाचा अर्जाचा तपशिल व निवड प्रक्रियेचा तपशिल नियम/अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात आला आहे.

पदासाठी पात्रता :—

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | दरमहा एकत्रित वेतन | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ संशोधन सहाय्यक** | ०१ | २४,०००/— | १. कृषी व संलग्न शाखेतील पदवीधर.<br>२. नेट परीक्षा उत्तीर्ण.<br>३. MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण.<br>४. कार्यालयीन कामाच्या अनुभवास प्राधान्य<br>५. ICAR Education Portal वर काम करण्याच्या अनुभवास प्राधान्य |
| २ | **कार्यालय सहाय्यक /लिपीक** | ०१ | १६,०००/— | १. कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण,<br>२. MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण,<br>३. इंग्रजी ४० श.प्र.मि.व मराठी ३० श.प्र.मि. टंकलेखन<br>४. कार्यालयीन कामाच्या अनुभवास प्राधान्य<br>५. ICAR Education Portal वर काम करण्याच्या अनुभवास प्राधान्य |

नियम/अटी व शर्ती :—

१. इच्छुक उमेदवारांनी विहीत अर्जाच्या नमुन्यामध्ये पुर्ण तपशिल भरून अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित सादर करावा. सदर अर्ज दिनांक **१३ मार्च २०२३** पर्यंत **शिक्षण संचालक, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली** यांचे नावे टपालाने, हातबटवडा अथवा कुरीअर द्वारे पाठविण्यात यावा.
२. लखोटयावर ज्या पदासाठी अर्ज करावयाचे आहे त्याचे नाव नमुद असणे आवश्यक आहे.
३. वयोमर्यादा— खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता अर्जदाराचे वय ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्षे राहील.
४. ज्या उमेदवारांना दोन्ही पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्यांनी प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
५. अर्जा सोबत शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा पुरावा व इतर आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत अथवा स्वयंसाक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जावर स्वत:चा अलिकडचा फोटो चिकटवावा.
६. उमेदवारांच्या प्राप्त अर्जांची छाननी करण्यात येईल व पात्र आणि अपात्र अर्जधारकांची यादी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर **https://dbskkv.org** प्रसिध्द करण्यात येईल.
७. पात्र उमेदवारांची निवड समितीव्द्वारे नमुद तारखेला मुलाखत घेण्यात येईल.
८. मुलाखतीच्या दिवशी अर्जासोबत नमुद सर्व मुळप्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
९. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जाणार नाही.
१०. नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहीत नमुन्यात रू. १००/— किमतीच्या स्टॅम्प पेपरवर उमेदवाराने हजर होतेवेळी कार्यालयात सादर करावा. त्यानंतर सदर नेमणूक कार्यान्वित होईल.

११.उमेदवाराला प्रकल्प/योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली च्या नियमीत आस्थापने वर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

१२.उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना द्यावी लागेल अन्यता एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

१३.तात्पुरत्या नेमणुकी नंतर निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने राजीनामा दिल्यास प्रतिक्षा सूचीतील उमेदवाराची उर्वरीत कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येईल.

१४.तात्पुरत्या नेमणुकीच्या कालावधीत सर्व शासकीय सुट्टया आणि दोन महिन्यांसाठी एक यानुसार किरकोळ रजा देय राहतील. या व्यतिरीक्त रजा हया बिनपगारी करण्यात याव्यात.

१५.कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ०९.०० ते सायंकाळी १७.३० अशी राहील तथापी, दिवसाचे काम वाढल्यास काम पुर्ण होईपर्यंत थांबावे लागेल तसेच सुट्टीच्या दिवशी सुध्दा कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१६.जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१७.काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

१८.सदर तात्पुरती नियुक्ती अकरा माही कालावधी करीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१९. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्ती वरिल उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

२०. कोणत्याही टपाल विलंबासाठी संबंधित कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२१.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ मध्ये अर्जा सोबत सादर करावे. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ चे प्रपत्र जाहिराती सोबत जोडण्यात आले आहे.

२२. नावामध्ये बदल असलस्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

NO.DRBSKKV/DNS- C / 882 /2023
DR.B.S.K.K.V.,DAPOLI
DATE : 01 MAR 2023

शिक्षण संचालक
**डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी—**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना रवाना.

२/— त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात व अर्जाचा नमूना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यात यावा.

**डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**शिक्षण संचालनालय नोडल सेल**

## जाहीरातीचा अर्जाचा नमुना

| पदाचे नाव— | | पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवण्यात यावा |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे नाव | : |
| २. | जन्मतारीख | : |
| ३. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता | : |
| ४. | संपर्क क्रमांक | : |
| ५. | ई—मेल | : |
| ६. | दिनांक.........रोजी वय | :........ वर्ष .......... महिने ............ दिवस |
| ७. | धर्म/ जात | : |
| ८. | शैक्षणिक अर्हता | : |

| अ. क्र. | परिक्षा/ पदवीचे नाव/ कोर्सचे नाव | बोर्ड / महाविद्यालयाचे / शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अनुभव :

| पदाचेनाव | कालावधी | | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०. इतर अर्हता:

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास पदासाठी मी पात्र नसेन याची मला जाणीव आहे.

दिनांक :—
ठिकाण :—

उमेदवाराची स्वाक्षरी

---

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र) नियम, २००५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना— अ प्रतिज्ञापपत्र**

मी, श्री/श्रीमती/कुमारी ........................................................................................ श्री. ........................................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय .......... वर्षे, राहणार ........................ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ............................................ या पदासाठीमाझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ......... (संख्या) इतकी मुले हयात आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण—

उमेदवाराची सही